स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 28–09–2017** रोजी **दुपारी 12–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **श्री. संदिप चंद्रभान जाधव** | **सभापती** |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 4. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 5. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 6. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 7. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 8. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 9. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 10. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 11. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 12. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 13. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 2. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 3. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

**1.** श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
**2.** श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**<u>ठराव क्रमांक 154</u>:–** स्थायी समिती ठराव क्र. 54, दि. 29/05/2017 **{समाज कल्यान विभाग}** पुनविचारार्थ ठेवण्याबाबत.

नागपूर महानगरपालिका नागपूर अंतर्गत स्पर्धा परिक्षा पूर्व प्रशिक्षण केंद्रासाठी नियुक्त करावयाच्या एजेंसीकरिता EOI द्वारे आवेदन मागविण्याचे स्थायी समितीचे ठराव क्र. 54, दि. 24/05/2017 पुनर्विचारार्थ घेण्याचा विषय समितीने विचारात घेऊन स्वारस्य अभिरुची प्रस्तावात सादर झालेल्या अटी व शर्ती या स्थायी समितीस योग्य वाटत नाही या विषयातील तज्ञ सल्लागाराकडुन अभिमत घेऊन योग्य अटी व शर्तीसह विषय स्थायी समिती समोर सादर करावा या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 155</u>**:— अंबाझरी ओव्हरफ्लो पांईन्ट येथे स्वामी विवेकानंन्द स्मारकाचे
{लोककर्म झोन क्र. 2} सौंदर्यीकरण व विकास करणे. (वाढीव खर्चास मंजुरी प्रदान करणे)

कामाचे नाव :— अंबाझरी ओव्हरफ्लो पांईन्ट येथे स्वामी विवेकानंन्द स्मारकाचे कामात विविध स्थापत्य कामे करणे.

| | |
|---|---|
| सुधारीत प्रशासकीय मान्यता | : रू. 47,67,000/— |
| पद क्र. | : 706 (जुने) (A 46701673520 —नविन) |
| करारनामा क्र | : 828/G दि. 26/2/2013. |
| करारनामा रक्कम | : 47,67,000/— |
| कंत्राटदार | : मे. सायली Construction |

स्वामी विवेकानंन्द स्मारकाचे सौंदर्यीकरण व विकासाचे काम सध्या सुरू आहे. हे काम शहरातील काही सुंदर स्थळापैकी एक स्थळ म्हणून विकसित करण्यात येत आहे. या कामात स्मारकाचे सौंदर्यीकरण करण्याकरिता विविध प्रकारचे काम घेण्यात आले आहेत.

याच प्रकल्पाचा एक भाग म्हणून विषयांकित काम करारनामा क्रमांक. 828/G दि. 26/2/2016 अन्वये मे. सायली कंन्स्ट्रक्शन यांना प्रदान करण्यात आलेले आहे.

स्वामी विवेकानंन्द स्मारकाचे महत्व व या स्मारकाला नागपूर शहराचे एक आकर्षण होण्याच्या दृष्टीने व सदर स्मारक आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्हावे व नागपूरात पर्यटनाचा वाव वाढावा या करिता विविध स्तरावरील होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने व मनपा मधील मा. महापौर, मा.स्थायी समिती अध्यक्ष, व मा. सत्तापक्ष नेते व इतर मान्यवर यांचे स्तरावरून या कामाच्या सौदर्यात अधिक भर पडेल व शहरातील एक आकर्षण निर्माण होईल असे करण्याकरिता सुचना प्राप्त होत आहेत. त्या अनुषंगाने कामाच्या अंदाजपत्रकीय कामात बदल होत असुन काही बाबीमध्ये वाढ होत आहे व त्यामुळे प्राकलनातील (करारनाम्यातील) काही बाबींच्या Quantity मध्ये वाढ होत आहे. व काही बाबीच्या Quantity कमी होत आहेत त्यामुळे सदर कामात पुर्नप्राकलन (Revised Estimate) मंजुर करणे आवश्यक आहे.

सदर कामाचे पुर्नप्राकलनाकरीता तुलनात्मक तक्ता सोबत संलग्न असुन वाढीव Quantity नुसार रू. 13,29,637/— (Below Rate सहित) ची अतिरिक्त राशी काम पूर्ण करण्यास आवश्यक आहे. सदर कामाची सुधारीत मान्यता रक्कमरू. 57,08,980/— ची असुन अशा वाढीव कामामुळे आता या कामाची किंमत व रू. 73,01,360 व रू. 60,96,635/— (Below नुसारच) होत आहे.

स्मारकाच्या कामाकरीता असलेले पद क्र. A 46701673520 मध्ये तरतुद व प्रावधान उपलब्ध असल्याने पुर्नप्राकलनाचा वाढीव खर्च रू. 13,29,637 व हे काम करण्यास सल्लागारास दयावयाचे रू. 5,31,85/— व असे एकुण 13,82,822/— व या कामाची वाढीव किंमत रू. 60,96,636 व 2,23,589/– असे एकुण रू. 63,20,225/— यास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त होण्यास व खालीलप्रमाणे मंजुरीस्तव सादर केलेला प्रश्न विचारात घेऊन,

1) कामाचे सुधारीत प्राकलनिय राशी रू. 73,01,360 व सल्लागाराचा खर्च रू. 2,49,040/— असे 75,50,400/— च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

2) सदर वाढीव काम मुळ कंत्राटदार मे. सायली Construction यांचे मार्फत करारनामा दरावर कार्यान्वयीत मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

3) सदर वाढीव खर्च पद क्र. A 46701673520 मधून खर्च करण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 156:–</u>** धरमपेठ झोन क्र. 2 आर्थिक वर्ष 2017–2018 चे प्रभाग
**{लोककर्म झोन 02}** समितीस अधिकार असलेल्या पदाबाबतचे प्रभागनिहाय विनियोजन करण्यास प्रभाग समितीने दि. 14.08.2017 च्या सभेत ठराव क्र. 14 अन्वेय मंजुरी प्रदान केली. पद क्र. 641 (A42010174602) मधून रु. १२.०० लक्ष मुख्यालयातील पद क्र. 597 (A43401171602) (मशिनरी खरेदी) तसेच पद क्र. 561 (A45610172909) मधून रु. 5.00 लक्ष पद क्र. 597 (A43401171602) (मशिनरी खरेदी) असे एकूण रु. 17.00 लक्ष 597 (A43401171602) (मशिनरी खरेदी) अंतर्गत टिप्पर खरेदीसाठी वळते करण्याचे प्रभाग समितीने सदर ठरावाद्वारे प्रस्तावित केलेले आहे.

सदर प्रस्तावास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेऊन सदर प्रस्तावास मा. सभागृहाची मंजुरी आवश्यक असल्याने सभागृहाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन परिशिष्टासह एकमताने मंजूरी प्रदान करुन, पुनर्विनियोजन प्रस्ताव अंतिम मंजुरीकरिता म.न.पा. सभागृहास पाठविण्याच्या शिफारसीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 157:–</u>** वित्तीय वर्ष 2017–18 करीता म.न.पा. मंजूरी अंदाजपत्रकान्वये
**{लोककर्म झोन 08}** लकडगंज झोन क्र. 8 करीता एकूण रु. 729.00 लक्ष म.न.पा. स्थायी समितीने विविध पदांतर्गत (महसुली व भांडवली) आवंटन केले आहे. या आधारे प्राप्त राशीची क्षेत्रिय कार्यालयातील प्रभागनिहाय व क्षेत्रिय कार्यालयातील म्हणजेच रु. 729.00 लक्ष आवंटन प्रस्तावित केले आहे. सबब विषयानुषंगाने रु. 729.00 लक्ष राशीचे क्षेत्रिय कार्यालयाचे वर्ष 2017–18 च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 158:–</u>** प्रभाग क्र. 2 (ड) येथील वाल्मीकी आंबेडकर आवास योजना
**{लोककर्म झोन 09}** वसाहतीत सिमेंट कॉंक्रीट पेव्हमेंटचे काम करण्यास्तव रु.1,36,88,900/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 159:–</u>** वित्तीय वर्ष 2017–18 करीता म.न.पा. चे मंजूर
**{गांधीबाग झोन 06}** अंदाजपत्रकान्वये गांधी झोन, महाल क्र. 6 करीता एकूण रु. 729.00 लक्ष म.न.पा. स्थायी समितीने विविध पदांतर्गत (महसुली व भांडवली) आवंटन केले आहे. या आधारे प्राप्त राशीची क्षेत्रिय कार्यालयातील प्रभागनिहाय व क्षेत्रिय कार्यालयातील म्हणजेच रु. 729.00 लक्ष चे आवंटन प्रस्तावित केले आहे. सबब विषयानुषंगाने रु. 729.00 लक्ष राशीचे क्षेत्रिय कार्यालयाचे वर्ष 2017–18 च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 160:–</u>** नागपूर महानगरपालिकेचे विविध विभाग, झोनल कार्यालय
**{सा.प्र.वि.}** तसेच नागरी सुविधा केद्रामध्ये दैनदिन कामाकरिता लागणारे कार्यालयीन स्टेशनरी व साहित्य खरेदीसाठी नविन दरकरार निश्चित करण्याकरिता स्थायी समिती ठराव क्र. 437, दिनांक 29.08.2016 व मा. आयुक्त यांचे दिनांक 14.09.2016 चे मंजुरीनुसार वार्षिक खर्च रू. 50 लक्ष ची ई–निवीदा मागविण्यात आली असता 03 निवीदाधारकांची संयुक्त निम्नतम दराची सुची तयार करण्यात येवून व निम्नतम दरामध्ये निवीदाधारकाने 01 % सुट देण्याबाबतचे पत्र कार्यालयात सादर केले. सार्वत्रिक निवडणूक 2017 ची आचारसंहिता लागू असल्याने व दैनंदिन कामाकरिता लागणारे स्टेशनरी व साहित्य खरेदी करणे आवश्यक असल्यामुळे मा. आयुक्त यांनी दिनांक 12.01.2017 ला मंजुरी प्रदान करून कार्यादेश देण्यात आले. व त्या कार्यादेशाचे रू. 25.96 लक्ष चे भुगतान सुध्दा करण्यात

आलेले आहे. व निवडणूकी नंतर विषय मा. स्थायी समितीकडे पाठविला असता, स्थायी समिती ठराव क्र.75 दिनांक 23.06.2017 अन्वये विभागाने नविन निवीदा काढाव्या व त्यावर सक्षम प्राधिकरणांची मंजुरी घेणेबाबत व इतर निर्देश दिलेत.

त्यानुसार ई–निवीदा क्र.100/पीआर, दिनांक 01.07.2017 नुसार लघुनिविदा मागविण्यात आल्यात, तथापि लघु निविदा मंजूर करण्याचे प्रक्रियेच्या कालावधीत दैनंदिन कामाकरिता लागणारे स्टेशनरी व साहित्य खरेदी करणे आवश्यक असल्यामुळे जुन्या दरानुसार रू.10 लक्ष पर्यंतच्या कामास मा.आयुक्तांचे दि.10.07.2017 चे मंजुरी अन्वये रू 9.77 लक्ष चे कार्यादेश देण्यात आले आहे. ई–निवीदेत एकुण 03 वैध निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या असुन 03 निविदाकारांच्या दराच्या सूचीमधील सर्व दर निम्नतम नसल्याने तिन्ही निविदाधारकांची संयुक्त निम्नतम दराची सूची तयार करण्यात येवून 1) मे. गुरूकृपा स्टेशनर्स ॲन्ड प्रिंटर्स नागपूर, 2) मे. पी. ॲन्ड जी. सेल्स कॉर्पोरेशन नागपूर 3) मे. सुदर्शन पेपर कन्व्हेटिंग वर्क्स नागपूर यांनी निम्नतम दरामध्ये 3 % सुट देण्याबाबतचे पत्र वाटाघाटीनंतर कार्यालयात सादर केले आहे. स्थायी समिती ठराव क्र.75 दिनांक 23.06.2017 अन्वये दिलेल्या निर्देशाबाबत नस्तीतील टिपणीनुसार अहवाल व निवडणूकीचे कालावधीत करण्यात आलेल्या रू. 25.96 लक्षचे कामास व लघुनिविदा प्रक्रिया कालावधीत करण्यात आलेल्या रू 9.77 लक्ष चे कामास कार्योत्तर मंजुरी प्रदान करणे, व अहवाल मान्य करून संयुक्त दरांवर उपरोक्त तिन्ही निविदाधारंकांकडून पुढील 03 वर्षाकरिता स्टेशनरी व साहित्य खरेदी करण्यास्तव येणारा प्रतिवर्ष खर्च रू. 50 लक्ष रकमेचे खर्चास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1) ठराव क्र. 75 दि. 23.06.2017 कायम ठेवण्यात येतो.

2) लघुनिविदा प्रक्रिया कालावधीत करण्यात आलेल्या रु. 9.77 लक्ष चे कामाची नोंद स्थायी समितीने घेऊन कार्योत्तर मान्यतेस मंजुरी प्रदान करते.

3) प्रस्तावित निविदा दरास 3 वर्षाकरिता मंजुरी प्रदान करण्यात येते तसेच प्रतिवर्ष रु. 50.00 लक्ष मंजुरी प्रदान करते व एकूण रु. 150 लक्षाचे खर्चास तीन वर्षाच्या कालावधीकरिता वित्तिय मान्यता प्रदान करते.

वरील सूचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 161</u>:– {शिक्षण विभाग}

प्रभाग क्र. 25, मधील श्रीमती वारनबाई भरतलाल ठाकरे, यांचे भांडेवाडी येथील खाजगी इमारतीमध्ये भाडयाने मनपाची भांडेवाडी हिंदी उच्च प्राथमिक शाळा म.न.पा. नागपूर या शाळेचे वर्ग भरतात. सदर इमारतीच्या वाढीव किराया संदर्भात कार्यकारी अभियंता (Z.P. Work Division) नागपूर यांचे रेन्ट सर्टिफिकेट नुसार दि. 01.02.2014 ते 31.01.2019 पर्यंत मासिक भाडे रू. 14,000/– प्रमाणे किराया वाढीव बाबतचा प्रस्ताव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 162</u>:– {कर विभाग}

कर व कर आकारणी विभागाचे दि. १ एप्रिल २०१७ पासून ते आजपर्यंत झालेली वसुली तसेच जप्ती कार्यवाही केली असल्यास याबाबतची माहिती व आढावा समितीने घेतला असता वसुलीचे प्रमाण अतिशय घटले आहे. यावर स्थायी समितीने तिव्र नाराजी व्यक्त केली. पुढील महिन्यात ज्या मालमत्ता धारकांनी कर भरणा केला व त्यांचेवर नियमाप्रमाणे लिलावांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्या सर्व मालमत्तांची कार्यवाही पुढील महिन्यात पूर्ण करावी. व वसुलीची टक्केवारी वाढवावी अशी स्थायी समिती निर्देश देते.

**<u>ठराव क्रमांक 163</u>:—** बाजार विभागाद्वारे दि. 1 एप्रिल, 2017 पासून ते आजपर्यंत
**{बाजार विभाग}** झालेली वसुली तसेच दुकांनाची नुतनीकरणबाबत कार्यवाही व आवश्यक माहिती व आढावा समितीने घेतला असता, नोंद घेऊन वसुलीचे प्रमाणात वाढ करावी अशी ही स्थायी समिती निर्देश देते.

**<u>ठराव क्रमांक 164</u>:—** नगररचना विभागाद्वारे दि. 1 एप्रिल, 2017 पासून विभागाकडे
**{नगररचना विभाग}** सादर करण्यात आलेले रेखाचित्र आजपर्यंतची संख्या, मंजूर रेखाचित्रांची संख्या, नामंजुरीची रेखाचित्रांची संख्या व प्रलंबित प्रकरणाची संख्या याद्वारे प्राप्त महसूल याची अद्यावत माहिती व आढावा समितीने घेतला असता प्रलंबित प्रकरणाची संख्या जास्त असून पंधरा दिवसाचे आत संपूर्ण प्रकरणाचा निपटारा करुन उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने कार्य करावे अशी ही स्थायी समिती निर्देश देते.

**<u>ठराव क्रमांक 165</u> :—** आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर